# प्रकरण पाचवे

## 'लेक भुईची' या पुस्तकाचा परिचय व वाङ्मयीन मूल्यमापन

पृष्ठ - ८३ ते ११९

# प्रकरण पाचवे
# 'लेक भुईची' या पुस्तकाचा परिचय व वाङ्मयीन मूल्यमापन

**प्रस्तावना :-**

विविध पुरस्कार प्राप्त असलेल्या डॉ. सौ. प्रतिमा इंगोले ह्या वैदर्भीय कथालेखिका असून त्यांचा 'लेक भूईची' हा ११ कथांचा कथासंग्रह आहे. त्यांच्या या कथासंग्रहाला 'ग्रामीण साहित्य प्ररिषदेचा कै. भि.ग. रोहमारे पुरस्कार' व 'अभिव्यक्ती लेखिका संस्था नागपूरचा कै. कृष्णाताई मोटे पुरस्कार' प्राप्त झाला आहे. 'लेक भुईची' या कथासंग्रहाची तृतीय आवृत्ती २००२ मध्ये सोनल प्रकाशनने प्रकाशित केली आहे.

डॉ. प्रतिमा इंगोले यांचा 'लेक भुईची' हा कथासंग्रह लोकप्रिय असून या कथासंग्रहात त्यांनी 'डुबतीची पावलं', 'परायाची लेक', 'मायमका', 'वटी', 'पयस्याची मेख', 'भोंड', 'सपन', 'कोळलीढन्न', 'दीठ', 'डोयाचा खेय', 'लेक भुईची' अशा ११ कथांचा समावेश केलेला आहे. ग्रामीण जीवनाचे चित्रण खूपच सुंदररीत्या प्रतिमा इंगोले करतात. 'या कथा वाचताना वारंवार प्रेमचंदांच्या कथांची आठवण होते. त्यांच्या कथांमधील दृश्य जीवनमूल्ये आणि जनवादी कथनशैली डॉ. इंगोले यांच्या कथांमध्येही आढळते. म्हणी आणि वाक्प्रचार यांचे प्राचुर्य हे कथांच्या निर्मितीला अनेक आयाम देणारे वैशिष्ट्य आहे. मानवी जाणिवांमधील आदिबंध, शतकाशतकातील जगण्यातून आलेले शहाणपण आणि भाषिक अर्थवत्तेचा कमाल प्रत्यय या गोष्टी म्हणी व वाक्प्रचारांच्या वापरामुळे येतात. अशी व सगळी वैशिष्टये धारण करणारी सध्याची मराठीतील एकमेव लेखिका म्हणून डॉ. प्रतिमा इंगोले यांचे नाव अधोरेखित करावे लागेल.'[१]

डॉ. सौ. प्रतिमा इंगोले यांनी या कथांमध्ये शेतकऱ्यांचे जीवन चित्रण, ग्रामीण भागातील स्त्रियांचे दु:ख, दारिद्रय यांचेही सुरेख चित्रण केले आहे. अस्सल वऱ्हाडी

भाषेचा वापर करून कथा अधिक रोचक केल्या आहेत. ग्रामीण भागाचे चित्रण करताना त्यांच्या कथांमध्ये निसर्गचित्रणाचा अभाव दिसतो. त्या 'माणूस' हा केंद्रबिंदू मानतात. एखाद्याची व्यथा, वेदना मांडताना त्या अतिशय समरस होतात. पात्रांच्या तोंडच्या संवादामुळे कथांमध्ये विशिष्ट प्रकारची वातावरणनिर्मिती आढळून येते. त्यांच्या 'लेक भुइची' कथासंग्रहातील ११ कथा वेगवेगळ्या आशयाच्या दिसून येतात.

अशा या कथांचा परिचय पुढील प्रमाणे :-

**१) डुबतीची पावलं :-**

'लेक भुईची' या कथासंग्रहातील 'डुबतीची पावलं' ही पहिली कथा असून या कथेचा नायक जनकराव हा एकहात्या कास्तकार आहे. त्याला तीन मुली आहेत. त्यातील मोठी सीताबाई. तिचं गेल्या वर्षीच अकोलीच्या रामरावाशी लग्न जमलं होतं. पण लग्न करण्यासाठी पैसे हवे होते. प्रत्येक वर्षी शेतात काहीच पिकत नसे आणि शेतात काही पिकलंच तर त्याचा बाजारात भाव उतरे. त्यामुळे जनकराव पूर्ण गायवाय झाला होता. जनकरावाच्या सोयऱ्याने लग्नासाठी खूप आग्रह धरला पण जनकरावाने मानला नाही.

मुलीचं लग्न करायचं तर पैशासाठी नगदी पीक पाहिजे म्हणून त्याने मुग आणि पऱ्हाटी पेरली, मुगाचा पैसा मुलीच्या लग्नासाठी आणि पऱ्हाटीचा पैसा सालभर कामी पडतो. कसंबसं साल निभते. पण मुगाला शेंगा आल्यावर पावसामुळे संपूर्ण मुगाची धुईधानी झाली, शेतात तण माजलं आणि सावकाराचं कर्ज आणखी डोक्यावर बसलं. त्यातच अकोलीचा सोयरा लग्न करण्यासाठी चकरा मारे आणि नाराज होऊन घरी परते. जनकराव नदीतल्या भवऱ्यात सापडावा तसा कोंडीत सापडला होता.

पुढे जनकरावाने कापसाचे पीक घेतले. कापूस चांगला पिकला होता. त्याला वाटलं की, कापसाचे पैसे आले की, आपण आपल्या सीताबाईचं लग्न लावून देऊ. कापूस विकण्यासाठी तो गाडी घेऊन गेला तर तिथे गाड्याच्या गाड्या कापसाच्या भरून आल्या होत्या. कसाबसा कापूस विकला पण कापसाचे पैसे तीन महिन्यानी

मिळणार होते. अकोलीचा सोयरा सारखा लग्नासाठी आग्रह करीत होता. जनकरावाने तीन महिन्यांनी लग्न करू असे सांगितले पण सोयऱ्याला हे काही पटले नाही. किती दिवस हेलपाटे घालायचे असा विचार करून त्यानं रामरावाचं दुसरीकडं लग्न जमवलं ही गोष्ट जनकरावाला समजताच त्याने कपाळी धोंडा मारून घेतला. सीताबाईच्या डोळ्याला धारा लागल्या. तिचा बाप रडू लागला. सीताबाईने मात्र आपल्यामुळे माणसासारखा माणूस रडत राहिला म्हणून आपणच हीन करमाचं आहोत असा विचार करून विहिरीकडे गेली आणि पाहतापाहता जलमय झाली. एका स्वप्नाची माती झाली. कपाळाच्या कुंकवाची लाही लाही झाली. पाहता पाहता उडून गेली.

जनकराव आकांत करीत बसला होता. पोरीच्या लग्नासाठी कार्यासाठी सावकाराकडे पुतण्या पैसे मागण्यासाठी गेला अशी ही गोष्ट आहे सीताबाईची डुबतीच्या पावलांची.

## २) परायाची लेक :-

'लेक भुईची' या कथासंग्रहातील 'परायाची लेक' ही दुसरी कथा असून या कथेची नायिका 'केसर' ही आहे. गरिबीमुळे तिच्यावर होणाऱ्या अन्यायाचे चित्रण या कथेत केले आहे. तिची मोठी जाऊबाई ही श्रीमंत घराण्यातील आहे. 'केसर' ही गरीब घराण्यातली एकुलती एक मुलगीं आहे. तिने तिच्या घरी जेवणाचे पुढचे ताटही उचलले नव्हते. पण सासरी आल्यावर गरिबाघरची आहे, तिला काम येत असणार असा समज सासरच्या लोकांचा असतो परंतु 'केसर' ही सोशिक असल्यामुळे ती सर्व काम निमूटपणे करीत असते.

तिच्या धाकट्या दीराच्या लग्नात काम करता करता तिला कंटाळा येतो. तिला आपल्या मायला पाहावं वाटतं. आपल्या मायच्या घरी जावसं वाटतं पण सर्वजण काम 'केसर'लाच सांगत असत. 'केसर' गरिबाघरची असली तरी तिच्या आईवडिलांनी एकुलती एक लेक म्हणून शेत विकून खर्च केला होता. तिच्या आईवडिलांना तिच्या दिराच्या लग्नाला बोलवत नाहीत. पण केसरच्या आईवडिलांनी एकुलती एक लेक

म्हणून शेत विकून बराच खर्च केला होता. तिच्या मोठ्या जावेच्या लग्नात जेवढा खर्च केला होता तेवढाच खर्च त्यांनी 'केसर'च्या लग्नात केला होता. आपली मुलगी सुखात रहावी हीच त्यांची इच्छा होती. पण इकडे मात्र केसरलाच सर्वजण राबवून घेत असत. तिची मोठी जाऊबाई मात्र अंगावर चांगले कपडे आणि दागिने घालत असे त्यामुळे ती टकाटक दिसत असे. पण केसरला सर्व काम करावे लागत असल्यामुळे ती मळलेली दिसे. पण त्या दोघींना निरखून पाहिले तर केसरच साजरी दिसत असे. तरीही तिची जाऊबाई श्रीमंत घराण्यातली म्हणून सर्वजण केसरलाच काम सांगत आणि बोलतही असत. केसरही सर्व कामे निमूटपणे करीत असे. तिची खूप मानहानी होत असे.

प्रतिमा इंगोलेंनी या कथेत एकत्र कुटुंबात गरीबाघरून सून म्हणून आलेल्या केसरची कशी अवहेलना केली जाते हे नेहमीच्याच प्रसंगाचा आधार घेऊन सांगितले आहे.

**३) मायमका :-**

'मायमका' ही प्रतिमा इंगोलेंची 'लेक भुईची' या कथासंग्रहातील तिसरी कथा असून या कथेत त्यांनी पांढऱ्या आजीचे व्यक्तिचित्र रेखाटले आहे. ही आजी मोठी धाडसी होती. तिने लावलेल्या प्रत्येक वेलाला खूप फळे येत पण तिच्या लग्नाला सात वर्षे झाली तरी तिला मूल झाले नाही. आजीने आबांना (तिचे पती) दुसरे लग्न करण्यास सांगितले, कारण आबा त्यांच्या आई-वडिलांना एकुलते एक होते. पण आबांनी ते मानण्यास साफ नकार दिला. तेव्हा आजीने तिच्या फुईबहिणीला सवत म्हणून घरात आणली आणि तिच्या फुईबहिणीला पाच लेकरे झाली आणि ती देवाघरी निघून गेली. पण आजीने त्या लेकरांना अंतर दिले नाही. स्वत:च्या मुलांसारखा सर्वांचा सांभाळ केला.

लेखिकेने या कथेत आजीची आणखी एक गोष्ट सांगितली आहे आणि ती म्हणजे घरात कोणीही गडीमाणसे नसताना तिने पकडलेल्या चोरांची. घरातील सर्व माणसे लग्नासाठी गेले होते. तेवढ्यात एक माणूस समोर आला आणि त्याने पाटीलबुवा

घरात आहेत कां? असे विचारले. तेव्हा आजीला शंका आली आणि आपल्या सुनांना, लेकरांना तळघरात पाठविले आणि आपल्या अंगावर असणारे चार-दोन दागिने तेही त्यांच्या हवाली केले. तळघराचं भुईसपाट दार लावलं आणि भरभक्कम कुलूप ठोकलं आणि त्याच्यावर अंथरूण टाकलं आणि तक्के ठेवले जसे काही पाहुण्यांची बैठकच आहे. त्यामुळे कुणालाच शंका आली नसती.

दहा-अकराजण एकदम दिंडी दरवाजातून आत घुसले आणि घरातील सर्व दाग-दागिने, सोन्या चांदीच्या देवाच्या मूर्ती वगैरे एका गाठोड्यात बांधून घेतल्या. पण आजी बाहेर होती हे त्यांच्या लक्षात आले नाही. आजीने बाहेरून दिंडी दरवाजा बंद करून घेतला आणि कलकलाट केला. तशा आजुबाजूच्या घरातील बायका मुले आणि चार-पाच गडी माणसे धावत आली. बाहेरचा दंगा ऐकून चोर हादरले. ते चोर पाठीमागच्या बाजूने जाऊन दोरावरून खाली उतरले आणि तोपर्यंत काही माणसे त्यांच्या पाठीमागे लागली. चोरांनी घेतलेले गाठोडे तेथेच टाकले आणि स्वत:चा जीव वाचविण्यासाठी वाट दिसेल तिकडे पळत सुटले. आजीने अशा तऱ्हेने आपल्या संपूर्ण घराची, वाड्याची काळजी घेतली होती. ती संपूर्ण गावाची पांढरी आजी झाली होती.

**४) वटी :-**

'वटी' या कथेत प्रतिमा इंगोलेंनी मांग समाजातल्या पुंजी मांगिणीचे दु:ख, दारिद्रय यांचे रेखाटन केले आहे. 'वटी' हे या कथेला दिलेले शीर्षक अतिशय समर्पक असे आहे. आपल्या मालकिणीच्या घरी पुंजी दररोज निसतुस करायला जात असे त्या बदल्यात तिला संध्याकाळी राहिलेले जेवण मिळत असे. पडेल ते काम ती तेथे करीत असे. तेथे तिला सुरक्षित वाटत असे आणि इतरांचा तिच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला होता आणि ते काम केल्यामुळे तिला आपल्या घरी चूलही पेटवावी लागत नव्हती. मालकिणीने दिलेल्या अन्नावरच तिची मुलबाळं भागत असत त्यामुळे ती खुशीत होती.

मालकिणीच्या मुलीच्या बाळंतपणासाठी तिला मालकीण (आत्याबाई) शहरात पाठवते. तिथे गेल्यानंतर मुलीची सासूबाई असेल नसेल ते सगळे काम पुंजी मांगिणीकडून करून घेते. कितीही काम केले तरी तिचे समाधान होत नसे. तिला शहरातही करमेना म्हणून ती गावाकडे जाण्याचा निर्णय घेते. येताना आपण केलेल्या कामाच्या मोबदल्यात आपल्याला केवळ आपल्या मानाची वटी दयावी अशी तिची इच्छा असते. पण त्या मुलीची सासूबाई तिची वटीही भरत नाही आणि देतही नाही. तिला लेकीच्या आईकडून वटी मागून घे असे सांगते. पूंजी गावाला येते आणि दुसऱ्या दिवशी वाड्यात कामासाठी जाते तर मालकिणीने दुसऱ्याच बाईला कामावर ठेवले होते ते पाहून पुंजीला खूप दुःख होते. ती आत्याबाईकडे आपल्या 'वटी' बद्दल सांगते तर आत्याबाईही 'वटी' देण्यास नकार देते. तेव्हा पुंजी मला उतारा तरी दया असे म्हणते तेव्हा म्हातारी ताडकन उठते आणि पुंजीच्या अंगावर दोरीवरचं लुगडं फेकते आणि सुनेला वटीचं सामान आणायला लावते. पुंजीनेही ते लक्ष्मी समजून त्यांना हात जोडले आणि दाणे वटीत घेतले.

घरी आल्यावर तिला समजते की, महिनाभर आपल्या लेकरांची खूपच दैना झाली होती. त्यांना वाड्यातलं शिळंपाकं काहीही भेटत नव्हतं. ते पाहून पुंजीच्या डोळ्यांना धारा लागल्या. सात दिवस ती ताप आल्यामुळे कुठेही कामाला गेली नव्हती आणि पुन्हा त्याच मालकिणीकडे ज्वारी मागण्यासाठी गेली. लेकरं उपाशी आहेत असं सांगितलं. ती तशीच ज्वारीची वाट बघत बसली पण ज्वारी कोणीच घेऊन आलं नाही. त्यातच तिच्या कानात माँ व भूक लागली असा आवाज घुमायला लागला तिच्या हातापायाला मुंग्या यायला लागल्या. तरी ती ज्वारीची आणि वटीची आशा धरून बसूनच राहिली. खरी मांगीण शोभायला लागली.

**५) पयस्याची मेख :-**

'पयस्याची मेख' या कथेत संपत्या शिंप्याच्या मुलीचे लग्न ठरत नव्हते म्हणून तो उदास असतो. त्याला तीन मुली असतात. पण पहिल्याच मुलीचं लग्न जमत नव्हतं.

मुलगी दिसायला चांगली होती पण लग्नात खर्च करण्यासाठी पैसे नव्हते म्हणून तिचं लग्न कुठेच जमत नव्हतं. पहिल्याच मुलीच्या लग्नाच्या वेळेस असे म्हटल्यानंतर संपत्या फारच खचून गेला होता. संपत्याचं हातावरचं पोट तर तो लग्नात पैसे कुठून खर्च करणार?

शेवटी एकदाचं त्याच्या मुलीचं लग्न ठरलं. पण तिच्या नवऱ्याचे हे तिसरे लग्न असते. तिच्या नवऱ्याच्या पहिल्या दोन बायकांनी जीव दिला होता. त्या दोघींची तीन मुले होती. केवळ त्या मुलांना सांभाळण्यासाठी आणि जेवण करण्यासाठी संपत्याच्या मुलीबरोबर नवरदेव लग्न करण्यास तयार होतो. नवरदेवाकडे खूप संपत्ती असते. त्याच्याकडे नोकर-चाकर असतात. लग्नाच्या दिवशी सगळं गांव नवरदेवाची वरात बघण्यासाठी जातात. पण त्याच्या मुलीची कुणालाच आठवण राहात नाही. ज्याला त्याला नवऱ्याच्या संपत्तीचाच हेवा वाटत राहतो. पण त्या गरीब संपत्याच्या मुलीची आठवण मात्र कुणालाच रहात नाही.

लेखिकेने या कथेत श्रीमंत लोक आपल्याला जे पाहिजे ते पैशाच्या जोरावर करू शकतात पण गरीब लोक मात्र आपल्या सोन्यासारख्या मुली पैशाच्या अभावी तीन लग्न झालेल्या नवरदेवाला देऊन टाकतात.

६) **भोंड :-**

'भोंड' या कथेत 'गोकुयीला' (गोकुळी) पाच मुलींच्या पाठीवर मुलगा झाला होता. त्याचं नाव तिनं 'नांगो' असे ठेवले होते. नागोबाच्या नवसाने तिला हा मुलगा झाला होता. गोकुळी दररोज कामाला जात असे. पण आज मात्र कामाला गेली तरी तिचे लक्ष सारे घराकडे होते. तिने छोट्या नांगोला आपली मुलगी दुर्गीजवळ ठेवले होते. दुर्गीचेही खेळण्याचे वय होते. ती आपल्या मैत्रिणीबरोबर भांडकुंडी खेळण्यात मग्न झाली होती. त्या तेथील शेजारच्या पडक्या वाड्यात खेळत होत्या. तिला खेळता खेळता नांगोची आठवणच राहिली नाही. नांगो मात्र माडीच्या वरच्या टोकावर जाऊन पोहोचला होता. मुलांनी कलकलाट केला आणि त्या कलकलाटाने नांगो पुरताच

भेदरला आणि माडीवरून खाली कोसळला. त्याने डोळे पांढरे केले. गावातला सरकारी डॉक्टरही हजर नव्हता. नांगोचा बाप धावाधाव करून छकडा आणि बैलजोडी मिळवतो. तो त्याला तालुक्याच्या ठिकाणी घेऊन जातो तिथे डॉक्टर त्याच्याकडे लक्ष देत नाहीत आणि नांगो रक्ताची उलटी करतो आणि तडफडून प्राण सोडतो. अतीव दु:खामुळे गोकुळीला फिटस् यायला लागतात आणि नांगोच्या मृत्युला दुर्गीच कारणीभूत असल्याचे ठरवून तिला उठसूठ बेदम मारहाण करते आणि भोंड येऊन पडते.

७) **सपन :-**

'सपन' ही कथा वाचल्यानंतर चित्रपटाचीच आठवण येते. 'विमल'च्या आईवडिलांचे स्वप्न असते की, विमलला तिच्या आत्याच्या मुलाला डॉक्टर विजयला दयावी. पण आत्याबाई (देवकाबाई) मात्र जास्त हुंडा मागत असते आणि विजयला केली तर श्रीमंताचीच मुलगी करीन असे म्हणत असते. पण विजयच्या, विजयच्या वडिलांच्या मनात असते की, विमलला सून म्हणून आपल्या घरी आणावी. कारण देवकाबाईच्या लग्नाच्या वेळी विमलच्या वडिलांनी कर्ज काढून तिला मोठ्या घरी दिली होती आणि तिथून पुढे विमलच्या वडिलांच्या घरी दारिद्रय आले. त्यांचे हे उपकार विमलला आपल्या घरी सून म्हणून आणून फेडावे असे त्यांना वाटत होते. पण देवकाबाईच्या अट्टाहासापुढे त्यांना काहीच बोलता येत नव्हते. विमल दहावी शिकलेली असते. ती ग्रामीण भागातील असल्यामुळे तिला लग्नासाठी तयार व्हावे लागते. तिचे लग्न दुसऱ्याच एका मुलाबरोबर ठरते. आणि लग्नाच्या दिवशी हळदी लागल्यानंतर नवरदेव तांदळाच्या वेळेस रूसून बसला आणि सोन्याची साखळी आणि अंगठी पाहिजे म्हणू लागला. विमलला हे समजलं तेव्हा तिने लग्नाला साफ नकार दिला. तिला घरातील सर्वांनी समजावले पण तिने ऐकलेच नाही शेवटी विजयच तिच्याशी लग्न करण्यास तयार होतो. त्याने स्वत:च्या मताने विमलशी लग्न करण्याचा निर्णय घेतला. विमलचं लहानपणापासूनच विजयशी लग्न करण्याचं स्वप्न सत्यात उतरते आणि तिच्या आईचे, वडिलांचे आणि घरातील सर्वांचे स्वप्न पूर्ण होते.

या कथेला दिलेले शीर्षक अतिशय योग्य असे आहे.

८) **कोळलीढन्न :-**

'कोळलीढन्न' या कथेत 'पूर्णा' नदी कोरडी पडली म्हणून गावामध्ये कोणकोणती आरिष्टे आली याचे चित्रण केले आहे. ही पूरनामाय कशामुळे कोरडी पडली तर माणसात माणुसकी राहिली नाही, माणसामाणसामध्ये ओलावा राहिला नाही. प्रत्येकजण पैशाच्याच पाठीमागे लागला आहे. पैसा नसेल तर माणूसही कोरडा पडतो. नदीसारखा आटतो.

या कथेतील यसोता भोई हा आपला माल खपेना म्हणून नाराज होता. त्यातच नदीचं पाणी आटलेलं होते. आपलं पीक चांगलं यावं म्हणून देवाला नारळ देण्याचं कबूल केलं होते. पण पीक काही शेतात येत नव्हतं. यसोता भोई असाच एकदा घराबाहेर पडला असताना त्याला परभ्या, लक्षा वगैरे मंडळी भेटतात. त्यांच्यामध्ये होणारे संवाद या कथेत चित्रित केले आहेत. पूरनामाय कशामुळे आटली तर माणसाची नीती बदलली म्हणून. गावच्या पुंड्या महाराची तालुक्याला कोर्टात तारीख होती. त्याने कोर्टातून येताना साहेबाला नमस्कार केला. साहेबाने कोर्टाची अब्रू घेतली म्हणून त्याला दंड केला. बाईची अब्रू घेतलेलं ऐकलं आहे पण कोर्टाची अब्रू घेतलेली मात्र आपण कधीच ऐकलं नाही. तसेच एका मास्तरानं तर ५०० रू. घेऊन नापास झालेलं पोरगं पास केलं. तसेच श्रीमंतांनी हुंडा घेतला तर चालतो पण गरिबांनी हुंडा घेतला तर त्याला लगेच सजा होते हा कुठला न्याय? यसोता भोईची आई आजारी असते. त्याचा मुलगा त्याला सांगायला येतो तर तो मनातल्या मनात म्हातारी मरते की काय असाच विचार करतो. दवाखान्यात जाऊन डॉक्टरला बोलवायला पाहिजे आणि म्हातारीच्या पुढच्या विधीसाठी पैशाची सोय करायला हवी याचा हिशेब करायला लागतो.

९) **दिठ :-**

'दिठ' म्हणजे दृष्ट. प्रतिमा इंगोले यांनी 'दिठ' ही अतिशय वेगळी अशी कथा लिहिली आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील माणुसकीचे चित्रण या कथेत केले आहे.

निपुत्रिक शेजारणीला मूल होत नाही आणि आपल्या शेजारणीने तिच्या दु:खाच्या वेळी तिची मदत केलेली असूनही तिचा मुलगा मेल्यानंतर मास्तरीण तिला भेटायलाही येत नाही. मास्तर गावात मुलांना शिकवण्यासाठी आला त्याला गावात रहाण्यासाठी खोली मिळत नव्हती त्यावेळी निपुत्रिक मालकीण मास्तरला रहायला जागा देते. मास्तरीण शिकलेली आहे. शहरात राहिलेली होती म्हणून मालकीण तिला सारवून देत होती. तिच्या दोन्ही मुलांना सांभाळत होती. तिच्या अडीअडचणीच्या वेळी मदत करीत होती पण मास्तरणीने तिच्या बाळंतपणाच्यावेळी तिला कसलीही मदत केली नाही. मुद्दामच झोपून राहिली. निपुत्रिक स्त्रीच्या दु:खाचे वेगवेगळे पदर इंगोले यांनी या कथेत मांडलेले आहेत. त्यामुळे ही कथा अतिशय चित्तवेधक ठरते. निपुत्रिक मालकीण आपले मूल मेले म्हणून आणि मास्तरणीला आपण वेळोवेळी मदत केली ती आपल्याला पाहायलासुध्दा आली नाही याचे खूप वाईट वाटते.

ग्रामीण व शहरी भागातील तफावत इंगोले मांडतात. शहरातल्या शिकलेल्या स्त्रिया परकेपणाने वागतात. माणूसकी विसरतात. त्या स्वत:च्या संसारातच गुरफटून जातात. ग्रामीण भागातल्या स्त्रिया रात्रंदिवस राबतात त्या स्त्रियांनाही संसार असतो. त्यांनाही वेदना होत असतात. अशा ग्रामीण व शहरी भागातल्या स्त्रियांचे चित्रणही प्रतिमा इंगोले करताना दिसतात.

**१०) डोयाचा खेय :-**

'डोयाचा खेय' या कथेत एका म्हाताऱ्या माणसाचे चित्रण केले आहे. गुंजी आणि इतर बायका, तिची माय शेतात दररोज कामाला जात असत. रस्त्याने जात असताना गुंजीला व तिच्या मायला एक म्हातारा माणूस दिसला. तो म्हातारा चालत निघाला आहे हे पाहून त्या दोघींना खूप वाईट वाटते. एवढा म्हातारा आहे त्याच्याकडे एस.टी.ने जाण्यासाठी पैसे नसतील असे त्यांना वाटले. त्यांनी म्हाताऱ्याकडे विचारपूसही केली पण म्हाताऱ्यालाच चालत जायची हौस होती. बुढ्याला वाटेत खाटीकलोक एका म्हाताऱ्या गाईला घेऊन जाताना दिसले. त्यांनी ती गाय १५० रू.

ला आणली होती. बुढ्याने विचारपूस केली आणि त्या गाईबद्दल त्याला खूप वाईट वाटले. त्याने ती गाय २०० रू. देऊन खाटकाकडून घेतली आणि कसायापासून तिची सुटका केली. गुंजीला व तिच्या मायला पहिल्यांदा पाहिल्यावर हा म्हातारा मळका वाटला पण तो ती गाय घेऊन जाताना त्या गायबरोबर तो ही तेवढाच पांढरा होऊन गेला होता. त्याच्या मनाचा मोठेपणा केवढा होता. गुंजी आणि तिची माय मात्र हा सगळा डोळ्याचा खेळ तोंडात बोट घालून बघत होत्या. त्यांना कामावर जायचेही लक्षात राहिले नव्हते.

**११) लेक भुईची :-**

'लेक भुईची' या कथेत प्रतिमा इंगोले यांनी जिजामातेच्या स्वप्नांची (वास्तवातील) कथा रेखाटली आहे. दाढीवाले लोक (मुसलमान) कुणाच्याही लेकींना, सुनांना पळवून नेत असत. त्यांची अब्रू लुटली जात होती. हे सारं जिजामातेनं स्वत:च्या डोळ्यांनी पाहिलं होतं. हे कुठंतरी थांबलं पाहिजे असं त्याना वाटत होतं. त्यावेळी शिवाजी महाराज त्यांच्या पोटातच होते. शहाजी राजेंचे निधन झाल्यानंतर त्यांना सती जावेसे वाटत होते पण शिवबाच्या ओढीने त्यांनी त्यांचा निर्णय बदलला. शिवबा पोटात असताना त्यांच्या मनात सतत दुश्मनाच्याच नाशाचा विचार यायचा. खाता-पिता, उठता बसता त्यांच्या मनात हेच घोळत असे आणि या आपल्या शिवाजी महाराजांनी जीवाची पर्वा न करता स्वतंत्र स्वराज्याची स्थापना केली. ही कथा जणूकाही जिजामाताच सांगत आहेत असे वाटते. त्या शिवाजी महाराजांवर फक्त एकदाच रागवल्या हे ही या कथेत सांगितले आहे. आपल्या पुत्राचा राज्याभिषेक सोहळा पाहण्याचे भाग्य त्यांना लाभले. त्यांचे स्वप्न पूर्ण झाले होते आणि अश्रूंच्या धारा सारख्या झरझर वाहत होत्या. त्या अश्रूंच्या धारांमुळे त्यांना पुढचे काही दिसत नव्हते. फक्त गागाभटाने म्हटलेले मंत्र तेवढे ऐकू येत होते. भुईतल्या झऱ्यावानी डोळे भरून भरून येत होते. कितीही मनाला समजावले तरी डोळ्यातील अश्रूंच्या धारा झरझर वाहत होत्या.

अशा प्रकारे डॉ. सौ. प्रतिमा इंगोले यांनी आपल्या 'लेक भुईची' या कथासंग्रहातील सर्व कथा समरसून लिहिलेल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या कथांना एक प्रकारचा कलात्मक दर्जा, वजन प्राप्त झाले आहे. ग्रामीण भागातील लोकांचे सुख, दु:ख, भाव-भावना यांचे सुरेख चित्रण या सर्व कथांमध्ये दिसून येते.

आता आपण प्रतिमा इंगोले यांच्या 'लेक भुईची' या कथासंग्रहाचे वाङ्मयीन मूल्यमापन पुढील प्रमाणे पाहणार आहोत.

**मुखपृष्ठाचे सौंदर्य :-**

'लेक भुईची' या कथासंग्रहाला मुखपृष्ठ दिले आहे नागपूरचे संजय धोतरकर यांनी. मुखपृष्ठाच्या वरच्या बाजूला नुकताच सुर्योदय होत आहे असे वाटते. सकाळी-सकाळी सूर्य किरणे तांबडी दिसतात. त्याप्रमाणे ही मुखपृष्ठावरील सूर्यकिरणे दिसत आहेत. मुखपृष्ठाच्या उजव्या बाजूस डोंगर दिसत आहेत. तसेच झाडाचा वरचा भाग दिसत आहे. तर डाव्या बाजूला काही घरे आणि एक मंदिर तसेच बरीच झाडे दिसत आहेत. मुखपृष्ठाच्या खालच्या बाजूला हिरवे गवत दिसत आहे. तसेच हिरव्या, काळ्या, तपकिरी रंगाच्या टेकड्या दिसत आहेत. अशा प्रकारे या कथासंग्रहाला अतिशय समर्पक असे मुखपृष्ठ दिले आहे.

**मलपृष्ठ :-**

मलपृष्ठावर डॉ. अंजली सोमण, पुणे यांनी दिलेले लेखातील दोन परिच्छेद मलपृष्ठावर दिलेले आहेत. तसेच झाडाची आलेली थोडीशी फांदी दिसत आहे. तसेच खालच्या बाजूला हिरव्या व तपकिरी रंगाची सूर्यकिरणे दिसत आहेत त्यामुळे मलपृष्ठाची शोभा वाढली आहे.

**समर्पक शीर्षक :-**

डॉ. सौ. प्रतिमा इंगोले यांनी 'लेक भुईची' हे अतिशय समर्पक असे शीर्षक दिलेले आहे. भुईच्या लेकाची आणि लेकीची कथा या संपूर्ण कथासंग्रहात वेगवेगळ्या कथांमधून सांगितली आहे. ज्याप्रमाणे जमिनीमध्ये निर्मितीची क्षमता असते.

त्याचप्रमाणे स्त्रियांच्यामध्ये सुध्दा निर्मितीची क्षमता असते म्हणून प्रतिमा इंगोलेंनी स्त्री म्हणजे भुई असे समजून या कथासंग्रहाला 'लेक भुईची' असे शीर्षक दिलेले असावे असे वाटते.

'अत्यंत काव्यात्म समर्पक आणि अर्थांची वलये निर्माण करणारे नांव 'भुईची लेक' प्रतिमाताईंनी या कथासंग्रहाला दिलेले आहे. स्त्री म्हणजे भुई, सीता, जमीन शेती आणि पृथ्वीही भुईचे सारे गुणधर्म उगवून येणे, सोसणे, भोगणे आपोआपच स्त्रीचे प्राक्तन होते आणि या प्राक्तनाच्या भोगवट्यांना तिला कोणतेही होकार नकार न टाळता कसे सामोरे जावे लागते याचे वर्णन या कथांमधून येते.'[२]

**'लेक भुईची' मधील स्त्रीचित्रण :-**

'लेक भुईची' या कथासंग्रहात लेखिकेने ग्रामीण भागातील स्त्रियांची अगतिकता, दु:खाची विविध रूपे चित्रित केली आहेत. ग्रामीण भागातील स्त्रियांना किती कष्टाची कामे करायला लागतात, तरीही त्या त्यात समाधान मानून जीवन जगत असतात. अशा कितीतरी स्त्रियांची चित्रणे या कथासंग्रहात केलेली आहेत. सीताबाई, केसर, पुंजी मांगीण, पांढ्ढीआजी, गोकुयी, संपत्याची मुलगी, विमल, विमलची आत्याबाई, निपुत्रिक मालकीण, मास्तरीण, गुंजी, जिजामाता अशा कितीतरी दु:खी, कष्टी स्त्रियांची चित्रणे प्रतिमा इंगोलेंनी केलेली आहेत.

'डुबतीची पावलं' या कथेतील सीताबाई डुबतीच्या पावलानं डोहाकडे जाते. आज भुईही अशीच डळमळत उभी आहे असे प्रतिमा इंगोलेंनी आपल्या मनोगतात लिहिले आहे. सीताबाईचे लग्न ठरवून ठेवलेले असते. दोन लग्नसराया गेल्या तरी जनकराव आपल्या मुलीचे लग्न करू शकत नाही कारण लग्न करण्यासाठी पैसेच उपलब्ध नसतात. पावसाच्या अभावी होत असणारे शेतकऱ्यांचे हाल लेखिका या कथेत रेखाटतात. शेतातच जर काही पिकले नाही तर शेतकरी राजा कसा सुधारणार? तो आपल्या मुलींची लग्ने कशी करणार? सीताबाईचे लग्न ठरवून ठेवलेले असते पण अकोलीच्या पाहुण्यानेही वाट पाहून शेवटी आपल्या मुलाचे दुसरीकडे लग्न ठरविले

आणि सीताबाईने आपले ठरलेले लग्न मोडले म्हणून विहीरीत उडी टाकून आत्महत्त्या केली. मुलीच्या शेवटच्या क्रियाकर्मासाठी जनकरावाला सावकाराकडून कर्ज घ्यावे लागते. असे चित्रण ग्रामीण भागात आपल्याला सतत पहायला मिळते. लेखिकेने 'सीता' हे पात्र निवडून या कथेत ग्रामीण भागातील स्त्रीचे दर्शन घडविले आहे.

तसेच 'परायाची लेक' या कथेत गरीबाघरच्या 'केसर'ची व्यथा मांडलेली आहे. 'केसर' ही एकुलती एक मुलगी पण लग्न झाल्यावर नांदायला गेल्यानंतर तिची कशी ससेहोलपट होते याचे चित्रण केले आहे. एकत्र कुटुंबात गरीबाघरच्या 'केसर'ची कशी घुसमट होते हे लेखिकेने अभिव्यक्त केले आहे. तसेच केसरने आपल्या आई-वडिलांच्या घरी पुढचे जेवणाचे ताटही उचललेले नसते. पण केसर गरीबाघरची म्हणून तिला सासरच्या घरात चाकराप्रमाणे वागणूक दिली जाते. तर 'मायमका' या कथेत पांढऱ्या आजीचे' व्यक्तिचित्र रेखाटले आहे. तिला मूल होत नाही म्हणून ती तिच्या नवऱ्याला दुसरे लग्न करण्यास सांगते. नवऱ्याने नकार दिला म्हणून ती आपल्या फुईबाईला सवत म्हणून घरात आणते आणि पुढे तिला पाच मुले झाल्यावर फुईबहीण देवाघरी गेल्यावर सख्ख्या मुलांप्रमाणे ती त्या मुलांवर प्रेम करते. ग्रामीण भागातील मनाने मोठ्या असणाऱ्या आणि धाडसी, त्यागी, प्रेमळ स्त्रीचेही चित्रण प्रतिमा इंगोले करतात.

'वटी' या कथेमध्ये पुंजी मांगिणीचे चित्रण केले आहे. आपल्या हक्काची वटी मिळावी म्हणून ती कशी धडपड करते याचे चित्रण या कथेत केले आहे. ती मुंबईला गेल्यानंतर तिच्या लेकराचे कसे हाल होतात. नंतर ती मालकीणीकडे कामासाठी परत येते तर तिला कामावरून काढून टाकले जाते. मालकीण आपल्या मुलीच्या बाळंतपणासाठी पुंजीला मुंबईला पाठवते. पण तिथेही तिला तिच्या हक्काची वटी मिळत नाही. म्हणून ती गावी येऊन मालकीणीला वटी मागते. पण तिला तिची वटी मिळत नाही आणि खायला अन्नही मिळत नाही. ती खरी मांगीण शोभायला लागते. तसेच 'पयस्याची मेख' कथेतील संपत्याची मुलगी दिसायला सुस्वरूप असूनही केवळ

पैशाच्या अभावामुळे दोन लग्न झालेल्या नवरदेवाबरोबर त्याच्या मेलेल्या दोन बायकांची मुले सांभाळण्यासाठी लग्नाला तयार होते. परिस्थितीमुळे नाडवल्या गेलेल्या कितीतरी स्त्रियांची चित्रणे प्रतिमा इंगोले आपल्या वेगवेगळ्या कथासंग्रहामधून करताना दिसतात.

'भोंड' या कथेतील गोकुळी दररोज दुसऱ्यांच्या शेतावर काम करायला जाऊन आपला चरितार्थ चालवत असे. तिला पाच मुली व एक मुलगा आहे. मुलगा नवसाने झाला म्हणून त्याचे नाव नागो असे ठेवते. पण पोट जाळण्यासाठी शेतावर काम करायला जावे लागत असल्याने तिला आपल्या छोट्या नागोला घरी ठेवून जायला लागते आणि एक दिवस हाच नवसाचा मुलगा माडीवरून पडून मरण पावतो. ती आपल्या नशिबाला दोष देत बसते. अशा नवस-सायासाने मुले होणाऱ्या व हातावरचे पोट असणाऱ्या स्त्रियांचेही चित्रण इंगोले करताना दिसतात.

ग्रामीण भागात दहावीपर्यंत शिकलेल्या 'विमल'ची कथा 'सपन' या कथेत प्रतिमा इंगोले एखाद्या चित्रपटाप्रमाणे मांडतात. ही विमल शिकलेली आहे. हुशार आहे. तिच्या आत्याचा मुलगा विजय हा डॉक्टर आहे. विमलचे व तिच्या आईवडिलांच्याही मनात असते की, विजयचे व विमलचे लग्न व्हावे. पण तिची आत्याबाई मात्र लग्नास तयार होत नाही. कारण तिला श्रीमंत घराण्यातील मुलगी हवी असते त्यामुळे विमल व विजयचे लग्न ठरू शकत नाही. विमलचे वडील तिचे लग्न दुसऱ्याच एका मुलाबरोबर ठरवतात. पण लग्नाच्या दिवशी तांदळाच्या वेळेस नवरदेव गळ्यातली साखळी आणि अंगठी पाहिजे म्हणून हट्ट धरून बसला होता. विमलला ते आवडले नव्हते म्हणून तिनेही हे लग्न करण्यास नकार दिला.शवेटी डॉक्टर विजयच तिच्याशी लग्न करण्यास तयार होतो. एक कवडीही न घेता त्याने विमलशी लग्न केले आणि सर्वांचे स्वप्न पूर्ण केले. परंतु विमलची आत्याबाई मात्र आपल्या मुलाला श्रीमंत घराण्यातील आणि जास्त हुंडा देणारी मुलगीच पाहिजे असा हट्ट धरून बसलेली असते. पण तिला आपल्या माहेरचा विसर पडला होता. विमलच्या वडिलांनी विमलच्या आत्याच्या लग्नात शेत विकून तिला

श्रीमंतांच्या घरी दिली होती आणि लग्नाचे कर्ज फेडता फेडताच त्यांना नाकीनऊ आले होते. पण विमलच्या आत्याला मात्र या सर्व गोष्टींचा विसर पडला होता. तिला पैशाचीच हाव लागलेली असते. परंतु डॉक्टर विजय हे सर्व जाणून असल्यामुळे त्याने विमलशी लग्न केले आणि सर्वांचे स्वप्न पूर्ण केले.

तसेच 'दिठ' या कथेत 'निपुत्रिक मालकीणी'चे व 'मास्तरणी'चे चित्रण रेखाटले आहे. ही निपुत्रिक मालकीण ग्रामीण भागातील आहे. ती शहरी भागातून आलेल्या मास्तरला व मास्तरणीला आपल्या घरी राहण्यासाठी जागा देते. मास्तरणीला अडीअडचणीच्या वेळी मदत करते. तसेच तिच्या मुलांचा सांभाळही आपली मुले समजूनच करते. परंतु मास्तरीण मात्र तिच्या बाळंतपणाच्या वेळी तिला पहायलाही येत नाही आणि तिचे मूल मेले म्हणूनही पहायला येत नाही. निपुत्रिक मालकीणीला मात्र खूप वाईट वाटते. सुशिक्षित असणारी ही मास्तरीण माणुसकीला जागत नाही. खेड्यातील अशिक्षित समजल्या जाणाऱ्या स्त्रिया पण त्यांच्यात माणुसकी खूप असते. परंतु शहरातील सुशिक्षित स्त्रिया मात्र आपली गरज भागली की, पुन्हा त्या व्यक्तीला विसरून जातात. अशा या ग्रामीण व शहरी भागातील स्त्रियांचे चित्रण प्रतिमा इंगोले यांनी आपल्या 'दिठ' या कथेत केले आहे. ग्रामीण भागात असणारी माणुसकी, जिव्हाळा, प्रेम, त्याग याचे चित्रण निपुत्रिक मालकीणीच्या व्यक्तिचित्रातून स्पष्ट केले आहे. तर मतलबी, स्वार्थी, दुष्ट स्वभावाच्या स्त्रीचे चित्रण मास्तरणीच्या व्यक्तिचित्रणातून अभिव्यक्त केले आहे. तसेच 'डोयाचा खेय' या कथेत दुसऱ्याच्या शेतावर काम करणाऱ्या 'गुंजीचे' चित्रण केलेले आहे. ग्रामीण भागातील स्त्रियांचे हातावरचे पोट असल्यामुळे त्यांना दररोज कोणाच्या ना कोणाच्या शेतावर काम केल्याशिवाय दोन वेळचे जेवण मिळत नाही आणि आपला चरितार्थ चालविता येत नाही याचे चित्रण केले आहे. तर 'जिजाऊ'चे शेवटच्या कथेत चित्रण केले आहे. 'लेक भुईची' असे कथेला नाव देऊन् जिजाऊलाच त्यांनी भुईची लेक मानले आहे. आणि

स्त्रियांच्यावर अन्याय अत्याचार करणाऱ्या मुस्लीम लोकांचे चित्रणही या कथेत केले आहे.

अशा या सर्व भुईच्या लेकींची कथा प्रतिमा इंगोले आपल्या कथासंग्रहातून मांडताना दिसतात. स्त्रियांच्या दु:खाचे विविध पदर सहजपणे उलगडून दाखविले आहेत. इंगोलेंच्या कथा केवळ 'पुरूषप्रधानतेवरच' भर न देता परिस्थितीने पिचलेल्या स्त्रियांचे दु:खही मांडतात.

'विदर्भातल्या 'कोळलीढन्न' पडलेल्या नदया ह्या जणू ग्रामीण जीवनातून आटत चाललेल्या ओलाव्याचंच प्रतीक आहेत. सरकारी योजना, त्या राबविणारे अधिकारी, ग्रामीण लोकांचा अशिक्षितपणा, राजकारण, गरिबी या साऱ्यातून भरडून निघणारे ग्रामीण जीवन आणि त्याचे ग्रामीण स्त्रीच्या भावजीवनावर होणारे परिणामांचे पडसाद प्रत्येक कथेतून उमटताना दिसतात.'[३]

**'लेक भुईची' मधील पुरूष चित्रण :-**

डॉ. सौ. प्रतिमा इंगोले यांनी 'लेक भुईची' या कथासंग्रहात ज्याप्रमाणे लेकीची व्यथा मांडली आहे त्याप्रमाणेचं भुईच्या लेकाचीही व्यथा, वेदना मांडली आहे. स्त्रियांच्या दु:खाचे विविध पदर ज्याप्रमाणे उलगडून दाखवितात त्या पध्दतीनेच पुरूष मंडळी ही जास्तीत जास्त शेतात काम करणारी, शेतीवरच आपले जीवन अवलंबून असणारी आणि त्यावरच आपला चरितार्थ चालविणारीही पुरूष मंडळी त्यांच्या कथेत दिसून येतात. प्रतिमा इंगोले यांच्या कथांमधून येणारी पुरूष चित्रणे कुठेही आक्रस्ताळेपणा करताना दिसत नाही. जे आहे, जसे आहे त्यातच धन्यता मानून जगतात. त्यातीलच एक पुरूषपात्र म्हणजे 'जनकराव'! 'डुबतीची पावलं' या कथेत जनकराव हा कास्तकार आहे. त्याला तीन मुली आहेत. त्यातील पहिल्या मुलीचे लग्न ठरले आहे. पण लग्नासाठी त्याच्याजवळ पैसे नाहीत. शेतात मूग आणि पऱ्हाटीचे पीक घेतल्यानंतर त्याचे जे पैसे येतील त्याच्यावर आपल्या मुलीचे लग्न होईल असे त्याला वाटते. पण निसर्गाच्या अभावी त्याचे मुग आणि पऱ्हाटीचे पीक येत नाही. शेतात

घातले तेवढे पैसेही मिळत नाहीत. जनकरावाचा पाहुणा मात्र चकरा मारीत राहतो आणि जनकराव मुलीचे लग्न पुढे ढकलत राहतो. पुढे वैतागून पाहुण्याने त्याच्या मुलाचे लग्न दुसरीकडे जमविले आणि हे ऐकून त्याच्या मुलीने सीताबाईने विहिरीत जीव दिला. जनकराव मात्र हतबल होऊन बसला. मुलीच्या क्रियाकर्मासाठीही त्याला सावकाराकडूनच कर्ज घ्यावे लागते. अशी ही भुईच्या लेकाची कथा प्रतिमा इंगोले मांडतात. आज भुईलाच वाईट दिवस आल्यामुळे शेतकरी राजाही हवालदिल झाला आहे. तसेच ग्रामीण भागातील मनाने मोठ्या असणाऱ्या माणसांचेही चित्रण इंगोले करतात. 'मायमका' या कथेतील 'आबा' हे मोठ्या मनाचे आहेत. त्यांच्या पत्नीला मूल होत नाही म्हणून त्यांची पत्नी त्यांना दुसरे लग्न करण्यास सांगते. कारण आबा हे त्यांच्या आई वडिलांना एकटेच होते. त्यांच्या आईवडिलांना नातवंडे असावीत असे वाटत असते. परंतु आबांनीच दुसरे लग्न करण्यास नकार दिला. जर का त्यांच्या नशिबातच मुले होणे नसेल तर दुसरे लग्न कशासाठी करायचे अशा विचाराचे असणारे हे आबा दिलदार वाटतात.

'पयस्याची मेख' या कथेतील 'संपत्या शिंपी' हा व्यवसायाने शिंपी आहे. तो खूप गरीब आहे. त्याचे हातावरचे पोट आहे. त्याची मुलगी लग्नाला आलेली असते पण मुलगी पाहून लोक पसंत करीत आणि संपत्याचं घरदार बघताच परत जात ते येतच नसत. त्यामुळे संपत्याने वैतागून शेवटी दोन लग्न झालेल्या नवरदेवाला आपली मुलगी दिली. नवरदेव श्रीमंत होता. पण त्याच्या दोन बायका मरण पावल्या होत्या. त्या दोघींची मुले सांभाळण्यासाठी नवरदेव संपत्याच्या मुलीशी लग्न करण्यास तयार होतो. संपत्याने आपल्या गरिबीला वैतागून आपल्या मुलीचे लग्न अर्धे वय झालेल्या नवरदेवाशी लावून दिले. अशा या परिस्थितीने गांजलेल्या पुरूषांचे चित्रणही इंगोले करतात. 'भोंड' कथेतील नांगोचा बाप नांगो माडीवरून खाली कोसळल्यानंतर नांगोला दवाखान्यात घेऊन जातो. पण गावातील दवाखान्यात डॉक्टर नसल्यामुळे नांगोला तालुक्याच्या ठिकाणी न्यावे लागते. तेथेही नांगोवर लवकर उपचार न

झाल्यामुळे नांगोला आपले प्राण गमवावे लागतात. ग्रामीण भागामध्ये सोयी-सुविधांचा, दळणवळणांचा अभाव असल्यामुळे लोकांना आपले प्राण गमवावे लागतात याचेही चित्रण प्रतिमा इंगोले यांनी केले आहे. तसेच ग्रामीण भागातील लोकांना कर्ज घेतल्यामुळे ते कर्ज फेडता फेडताच घरामध्ये कशा प्रकारे दारिद्रय येते याचे चित्रण 'सपन' या कथेत केले आहे. 'विमलचे वडील' हे शेतकरी आहेत. त्यांनी विमलला दहावीपर्यंत शिकविले होते. विमलच्या आत्याच्या लग्नात तिच्या वडिलांनी शेत विकून कर्ज काढून आत्याला मोठ्या घरात दिली होती आणि तिच्याच लग्नात घेतलेले कर्ज फेडता फेडता त्यांच्या नाकीनऊ येते. आत्याचा मुलगा विजय हा डॉक्टर असतो. विमलच्या आई वडिलांना वाटत असते की, विमलचे विजयशी लग्न व्हावे. परंतु आत्याला श्रीमंताघरची सून हवी असते. त्यामुळे ती विमलला सून म्हणून करून घेण्यास नकार देते. विमलच्या वडिलांना मात्र शेतात जे काही पिके त्यावरच खर्च भागवावा लागे. त्यामुळे त्यांनीही विमलचे लग्न दुसरीकडे ठरविले आणि लग्नाच्या दिवशी नवरदेव गळ्यातली साखळी आणि अंगठी पाहिजे म्हणून रूसून बसतो. परंतु विमलचे वडील शेतकरी असल्यामुळे ते त्या नवरदेवाची मागणी पूर्ण करू शकत नाही. मात्र शेवटी विजयला सर्व परिस्थितीची जाणीव असल्यामुळे विमलशी लग्न करण्यास तयार होतो. प्रतिमा इंगोले यांनी विमलच्या वडिलांचे पात्र निवडून शेतकरी वर्गाची समस्या मांडली आहे. परिस्थिती नसल्यास शेतकऱ्यांना कोणकोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते हे या कथेतून सांगितले आहे.

ग्रामीण भागातील माणसांच्या श्रध्दा, अंधश्रध्दा, त्यांची जीवनशैली यांचे सुरेख चित्रण प्रतिमा इंगोले करतात. माणसाच्या मनाचे विविध पदर हळुवारपणे उलगडून दाखवितात. 'कोळलीढन्न' कथेतील यसोता भोई हा शेतकरी आहे. आपल्या मालाला भाव मिळावा, नदीला भरपूर पाणी यावे, आपला माल खपावा म्हणून देवाला नारळ दयायचे कबूल केलेले असते. पण शेतात काहीच पिकले नाही. त्यामुळे त्याला वाटते की, देव आपल्यावर कोपला त्यामुळेच नदी कोरडी पडली आहे आणि शेतात पीक

येईनासे झाले. नदी कोरडी कशामुळे पडली याचे विविध संवाद लोकांच्या तोंडून या कथेत चित्रित केले आहेत. माणसात माणुसकी नसल्यामुळे आणि त्यांच्यात ओलावा न राहिल्याने नदी कोरडी पडली असे यसोता भोईला वाटते. प्रत्येकजण पैशाच्याच मागे लागला आहे. संपत्तीचा संचय करणे हाच एक उद्देश माणसे मनात ठेवून जगत आहेत आणि त्यामुळेच ही नदी कोरडी पडली असावी असे यसोता भोईसारख्या अंधश्रध्दाळू माणसांना वाटते म्हणूनच तो देवाला नारळ दयायचे कबूल करतो.

अशा या ग्रामीण भागात राहणाऱ्या आणि देवावरती विश्वास ठेवणाऱ्या भोळ्या भाबड्या माणसांचे चित्रण इंगोले करतात.

तसेच प्रेमळ, मायाळू, दयाळू अशाही पुरूष मंडळींचे चित्रण इंगोले आपल्या कथेत करतात. 'डोयाचा खोय' या कथेतील आबाजी हा वृध्द (म्हातारा) आहे. तो चालत घुंगसीला जात असतो त्यामुळे पाहणाऱ्याला तो गरीब आहे असेच वाटते. परंतु हा आबाजी मोठ्या मनाचा आहे. त्याचे मुक्या प्राण्यांवर प्रेम आहे. हे आबाजी रस्त्याने चालत असताना त्याला दोन खाटीक म्हाताऱ्या गाईला घेऊन जाताना दिसतात. त्यांनी ती गाय १५० रू. ला विकत घेतलेली असते. आबाजींने ती गाई २०० रू. देऊन त्या खाटकाकडून विकत घेतली आणि त्या गाईचे प्राण वाचविले. अशा या प्रेमळ स्वभावाच्या आबाजींच्या वर्तनातून ग्रामीण भागातील लोकांचे त्यांच्या प्राण्यांवर, गावावर, शेतावर इ. असणारे प्रेम दिसून येते.

डॉ. सौ. प्रतिमा इंगोले यांनी आपल्या या विविध पुरूषचित्रणाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील लोकांचे चित्रण केले आहे. ही शेतकरी मंडळी शेतीत राबतात आणि शेतीवरच आपला चरितार्थ चालवितात. इंगोले यांच्या कथांमधील हे पुरूष कुठेच आक्रस्ताळेपणा करताना दिसत नाहीत, कुणाची कुरघोडी करीत नाही. आहे त्या परिस्थितीत जगतात आणि मरतात. त्यांना आपल्या मालाला भाव यावा असे वाटते पण त्यांच्या मालाला कधीही किंमत मिळत नाही. त्यामुळे शेतकरी राजा गरीबच होत

गेला आहे. आपली अर्थव्यवस्था ही शेतीवरच अवलंबून आहे. पण आज मात्र या भुईची आणि भुईच्या लेकाची डळमळीत अवस्था झाली आहे. हे या कथासंग्रहातून दिसून येते.

**ग्रामीण समाजाचे वास्तव चित्रणं :-**

डॉ. सौ. प्रतिमा इंगोले यांनी ग्रामीण समाजाचे वास्तव चित्रण केले आहे. ग्रामीण भागातील स्त्री पुरूष, पशु-पक्षी, शेती, शेतीतील अन्नधान्य, गरिबी या बरोबरच शेतकऱ्यांनी कितीही कष्ट केले तरी त्यांच्या मालाला किंमत मिळत नाही तसेच खेड्यामध्ये विविध सोयी-सुविधा उपलब्ध नसल्यामुळे तेथील लोकांना कोणकोणत्या समस्यांना तोंड दयावे लागते याचे चित्रण त्या करतात.

'प्रतिमा इंगोले यांचा हा पाचवा कथासंग्रह. यातील एकंदर अकरा कथांमधून त्यांनी गरिबीने पछाडलेल्या विदर्भातील हताश ग्रामीण जीवनाचं चित्रण अतिशय नेमक्या, अस्सल वऱ्हाडी बोलीभाषेतून प्रभावीपणे केलेले आहे. गरिबांचे अपमानीत जीवन कोणाच्याही खिजगणतीत नसते हे विदारक सत्य या कथांमधून प्रत्ययाला येते. ग्रामीण भाषेतील प्रचलित म्हणींचा वापर कथेतील पात्रांना आणि प्रसंगांना जिवंतपणा आणण्यात महत्त्वपूर्ण ठरला आहे.'[४] ग्रामीण समाजाचे वास्तव चित्रण करताना 'डुबतीची पावलं' या कथेत खेड्यातील शेतीचे आणि शेतकऱ्यांचे वास्तव चित्रण करताना अस्सल वऱ्हाडी भाषेचा वापर करून कथांमध्ये एक वेगळ्याच प्रकारची वातावरण निर्मिती केली आहे. उदा. 'डुबतीची पावलं' - 'वावरं पेरे पन पिकेचना! हरसाल नापिकी! त्यात महागाई म्हणते मी! बिचारा एकहात्या कास्तकार! खत घियाले जावं तर दुप्पट पैसा दया लागे. इकून तिकून वावर पेरलं त मजुरी भरमसाठ चुकावा लागे.....फवारा मारला त मानसाले भोंडच ये. त्यानं बिचाऱ्या एकहात्याचं निऱ्हा चंदनच होये. इतलई करून वावर पिकलंच त बजारात त्याचा भाव उतरे आन एकहात्या चोर त चोर आन खोर त खोर होये. तोच पेसा लावे आन् बुडतीच्या पायानं डोवाकळे जाये.' अशा प्रकारे भुई आणि भुईच्या लेकाचे दुःख प्रतिमा इंगोले थोडक्यात पण अचूक टिपतात.

खेड्यातील मुली दिसायला सुंदर असतात पण त्यांच्यालग्नासाठी खर्च करायला वडिलांजवळ पैसे नसतात. शिक्षणाचा अभाव असल्यामुळे त्यांना शेतात काम करावे लागते आणि बाप ज्या ठिकाणी लग्न ठरवून देईल त्याच ठिकाणी नांदायला जावे लागते. गरीब घरातील मुलगी श्रीमंत कुटुंबात दिली तर तिला तिथे गरीबाघरची लेक म्हणून सर्वजण काम करायला लावतात याचे चित्रण 'परायाची लेक' या कथेत येते. तर 'पयस्याची मेख' या कथेत संपत्याच्या घरी काहीही नसते त्याचे हातावरचे पोट असते. त्यामुळे त्याची मुलगी सर्वजण लग्नासाठी नाकारतात आणि तो आपल्या मुलीचे लग्न दोन वेळा लग्न झालेल्या नवरदेवाशी लावून देतो. तसेच ग्रामीण समाजात असणाऱ्या १८ अलुतेदार आणि १२ बलुतेदार लोकांचेही चित्रण 'वटी' या कथेत केले आहे. या कथेत एका मांगिणीचे दु:ख चित्रित केले आहे. तर 'मायमका' या कथेत प्रेमळ आजीचे व्यक्तिचित्र रेखाटले आहे. 'भोंड' ही कथा वेगळी वाटते. शेतात काम करायला जाणाऱ्या गोकुळीचे आणि तिच्या मुलाचे चित्रण केले आहे. या कथेत ग्रामीण भागात दवाखाने असले तरी डॉक्टर हजर नसतात त्यामुळे लोकांना आपले प्राण गमवावे लागतात याचे चित्रण केले आहे. तर 'सपन' या कथेमध्ये विमलला शिकायचे असते तर तिचे वडिल आणि गावातील मंडळी मुलगी मोठी झाली म्हणून तिला पुढचे शिक्षण घेऊन देत नाहीत. तिचे लग्न ठरवतात.

तर 'कोळलीढन्न' या कथेत पूर्णामाय नदी कशामुळे कोरडी पडली याचे सुरेख चित्रण केले आहे. ग्रामीण लोकांच्या श्रध्दा, अंधश्रध्दा यांचे चित्रण या कथेत केले आहे. नदी कोरडी पडल्यामुळे आणि पाऊस नसल्यामुळे शेतात पीक घेता येत नाही आणि शेतकरी राजा कसा गरीब होतो याचे सुंदर चित्रण या कथेत केले आहे. पूर्वीच्या काळातील माणसे मनाने कशी उदार होती आणि मुक्या प्राण्यांवर प्रेम करणारी, एकमेकांची दु:खे समजून घेणारी होती हे 'डोयाचा खेय' या कथेतून दिसून येतो.

डॉ. सौ. प्रतिमा इंगोले आपल्या कथांमधून तेथील लोकांचे राहणीमान, दर्जा, तेथील वातावरण इ. चे दर्शन घडवितात. 'विदर्भातील आजचा ग्रामीण परिसर

झपाट्याने बदलत आहे. शहरी दिखाऊपणा आणि पैसा यांच्या आकर्षणामुळे ग्रामीण परिसर आपली स्वत:ची अस्मिता आणि संस्कृती गमावत चालला आहे. त्यांच्यात एक कोरडा शुष्कपणा येत चालला आहे. या परिवर्तनाचे पडसाद सर्वच ग्रामीण जीवनावर उमटत आहेत. पण एक स्त्री म्हणून ग्रामीण स्त्रीच्या जीवनातील दु:खांना त्यामुळे एक वेगळा आयाम प्राप्त होताना दिसत आहे आणि या कथासंग्रहातील बहुतेक कथा ह्याच केंद्राभोवती फिरताना दिसतात. त्या परिवर्तनाचे ग्रामीण स्त्री जीवनावर होणारे सूक्ष्म परिणाम आणि त्यातून तिच्या जीवनात निर्माण होणारे संघर्ष यांचे संवेदनशील चित्र या कथांमधून पहायला मिळते.'[५]

**'लेक भुईची'मधील भाषा :-**

'लेक भुईची' या कथासंग्रहातील कथांची भाषा साधी, सोपी, वेधक आणि ओघवती आहे. त्यांच्या भाषेत कुठेही कृत्रिमता जाणवत नाही. तसेच कथांमधील छोटी छोटी वाक्ये, म्हणी, वाक्प्रचार यांच्या वापरामुळे कथेत एक प्रकारचा गोडवा निर्माण होतो. तसेच वऱ्हाडी बोलीभाषेतील संवाद ही त्यांच्या कथांचे बलस्थान ठरतात. त्यांच्या भाषेत एक प्रकारची लय आढळते. 'प्रतिमा इंगोले यांच्या कथांना नेहमीच कथनाचा बाज असतो. तो या संग्रहातील कथांनाही आहेच. कथांची सुरूवातच त्या ढंगात होते. 'मायबापहो, एक गोठ हाये. तशी तुमच्या गावची. गोठ हाये जनकरावाची.' किंवा 'कोनाच्या तकदिरानं काय् हुईल अन् काय नायी हे गळ्या कोनालेच सांगता येत नायी. तुमी म्हतान कसं? त आता मायच पाहा ना. कोनाची कहाची गोठ त माही लगनाची गोठ हाय.' हा वऱ्हाडी ठसका पुऱ्या कथेत मग कायमच राहताना दिसतो.

पुऱ्या वऱ्हाडी ग्रामीण संस्कृतीचं चित्र रेखाटणाऱ्या या कथांतून मुळातच मिठासपणा असलेल्या वऱ्हाडी भाषेची अस्सल लज्जत वाचकाला आस्वादायला मिळते. कथा कधी उपरोधिकपणे तर कधी सहजच अंतर्मुख करतात ते वेगळचं!'[६]

तसेच प्रतिमा इंगोलेंनी ग्रामीण भागातील लोक जी भाषा वापरतात त्याच भाषेचा वापर करून कथा सुरस बनविल्या आहेत. 'इंगोलेंच्या या सर्व कथा वैदर्भीय

भाषेचा गोडवा घेऊन आल्या आहेत. या भाषेला एक नाद आहे. तसेच एक लय आहे. अनेक म्हणींचा उपयोग लेखिकेने केलेला आहे. उदा. 'खेयली तेदलोक खेयली, आन बयकू घियून पयाली.' तसेच

'धिटाई, खाये मिठाई आन गरीब खाये गचांड्या.' 'राजेहो!', 'लोकहो!' अशी संबोधने लेखिका वारंवार वापरते तसेच 'हमेशाचीच', 'जवानपनी', 'मालूम', 'आदत', 'जमानाई', 'जिनगानीच' असे हिंदी शब्दही अधूनमधून येतात. या वैदर्भीय ग्रामीण भाषेत अनेकदा 'ळ'च्या जागी 'य' येतो. उदा. 'घोळात' ऐवजी 'घोयात', 'फळे ऐवजी फये' तसेच 'व'च्या जागी 'य' येतो. उदा. 'वेचून' ऐवजी 'येचून'.

तसेच 'ड'या जागी 'ळ' येतो. उदा. 'छकडा' ऐवजी 'छकळा', 'पडदा' ऐवजी 'पळदा', 'लुगड' ऐवजी 'लुगळं'.

या भाषेत मरेलोग म्हणजे मरेपर्यंत तर शेवटलोग म्हणजे शेवटपर्यंत असे दिसून येते. सर्व कथांतून बोलीभाषेचा उपयोग केलेला आहे. काही शब्दांचे अर्थ नेमकेपणाने कळत नाही.'[७]

प्रतिमा इंगोले ह्यांच्या भाषेत ओलावा आढळतो. वऱ्हाडी भाषेचा वापर करताना त्या 'ह' ऐवजी'य', 'ड' ऐवजी'ळ', 'व' ऐवजी'इ', 'ण' ऐवजी'न', 'ळ' ऐवजी'ऊ', 'ढ' ऐवजी 'ळ', 'श' ऐवजी'स', 'ठ' ऐवजी'क', 'र' ऐवजी'ळ' अशा अक्षरांचा वापर करतात. तसेच दीर्घ उच्चार ऱ्हस्व करून लिहितात. उदा. नोता-नव्हता, ओझं-वझं, नाही-नायी, होता-व्हता, आहे-हाये, महिने-मयने असे कितीतरी शब्द सापडतात. तसेच त्या कथा लिहिताना एक विशिष्ट प्रकारची वातावरण निर्मिती करतात. वाचकाला पुढे काय होणार असेच वाटत राहते. 'या सर्वांपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे बोलीभाषेचा उपयोग. सर्व कथाच खानदेश व वऱ्हाडी बोलीत सांगितल्या आहे आणि त्यामुळेच त्या अधिक सजीव अधिक रंगतदार वठल्यात, इतक्या ताकदीने बोली भाषेतच सबंध कथा लिहिणे ही अवघड गोष्ट. जाता जाता कथेमध्ये बोलीभाषेतील वाक्प्रचार केवळ कथेला कलात्मकता यावी म्हणून पेरणे किंवा कथांतील संवाद बोलीभाषेतून लिहिणे असे आपण

पुष्कळदा पाहतो. पण संपूर्ण कथाच्या कथा सतत त्या भाषेत लिहिणे आणि त्यासुध्दा मिस्किलपणे, बेरकीपणे विनोदाच्या रंगाने सांगणे ही गोष्ट कठीण आहे. पण ही कठीण गोष्ट तितक्याच ताकदीने साध्य करून दाखविली आहे. प्रा. प्रतिमा इंगोले या लेखिकने! मुळात बोली भाषा लवचिक, वाहत्या पाण्यासारखी जिवंत प्रवाही त्यातून घटना नाट्यमय मग सांगण्याला आणखीनच रंग भरतो.'[८]

अशा प्रकारे प्रतिमा इंगोले यांच्या कथेची भाषा, साधी, सोपी असून त्यांच्या कथा अतिशय बोलक्या वाटतात आणि मनाला चटका लावून जातात आणि काही कथा तर मनात घर करतात.

**'लेक भुईची' कथासंग्रहातील संवाद :-**

'लेक भुईची' या कथासंग्रहातील संवाद हे ठसकेबाज आणि वातावरणनिर्मितीला पूरक असे आहेत. पात्रांच्या तोंडी कुठेही कृत्रिमता जाणवत नाही. तसेच या कथासंग्रहातील एकूण ११ कथा लिहिताना लेखिकेला पात्रांच्या तोंडचे संवाद लिहिताना कुठेही अडथळा निर्माण झाला नसावा हे त्यांच्या कथा वाचल्यानंतरच लक्षात येते. अत्यंत साधे, सोपे, सरळ असे त्यांच्या कथांमधील संवाद आहेत ते पुढील प्रमाणे -

१) 'केसर झालेच नायीत काय तुये भांडे आझून? तू भांडे घासून रायली का आपली तशीच बसली चिळ्या हकालत.'

'झाले ना बायजाई'(पृ. २०. 'परायाची लेक')

२) ''कुठी गेले पाटीलबुवा?''

कुठी त नायी गेले बापा.'' .

''कावून? लगना नायी गेले काय बुढे?''

''नायी त! मले त नायी सांगल बापा?''

''तुले काय सांगा लागते? साऱ्याच वाळ्यातले मानसं गेले लगना पाटीलबुवा कसे रायतील.''

"का जन बापा? आमाले म्हताऱ्या मानसाले काय मालूम रायते? देल्या भाकरचे धनी आमी."(पृ. ३५. 'मायमका')

३) "खरं हाये तुमचं! पन मले तयी गमेचना जी."

"काय देल तुले?"

"तुम्हाले मांगून घ्या म्हनल्या."

"आत्ता मायबाई! बरी हायेस व तू! धंदा तशी केला आन रोज मले मांगत?"

"मी नायी मांगत..... त्याइन म्हनलं ते सांगतो."

"तेई बरे हायेत! वटी त देलीसीन ना तुले?"

"नाय जी! तुमालेच मांगून घे म्हनल्या."

"बरी हायेस व तू! आली आपली हात हालोत. आन आता वधर तोंड करून मले वटी मागतं?" (पृ. ५६. 'वटी')

४) "थांबा मामा! मी करतो ईमलशी लगन!"

"अरे पन तुया मायले त बापा इस हजार हुंडा पायजे बापराजा."

"मामा मले एक खळकूई दिवू नका. मी आत्ताच इमीशी लगन करतो."(पृ. ८१. 'सपन')

अशा प्रकारे एकापेक्षा एक असे सुंदर संवाद वाचताना एक प्रकारची लय जाणवते. वैदर्भीय बोलीतील हे सहजसुंदर संवाद हे या कथासंग्रहाचे वैशिष्ट्य ठरतात. वऱ्हाडी भाषेतील मृदू भाषेमुळे एक प्रकारचा गोडवा निर्माण होतो आणि त्या पात्राचे तोंडचे संवाद वाचताना ते पात्रच आपल्या नजरेसमोर उभे राहते. असे हे संवाद वाचताना मनाला एक प्रकारचा चटका लावून जातात.

**'लेक भुईची' कथासंग्रहातील म्हणी, वाक्यप्रचार व वैदर्भीय शब्द :-**

'लेक भुईची' हा कथासंग्रह एकूण ११२ पृष्ठांचा असून यामध्ये एकूण ११ कथांचा समावेश केलेला आहे. ह्या सर्व कथा म्हणजे म्हणी, वाक्प्रचार आणि वैदर्भीय शब्द यांची सुंदर गुंफण केलेली साखळीच वाटते. प्रतिमा इंगोलेंनी या कथासंग्रहात

अनेक म्हणी, वाक्‌प्रचार, वैदर्भीय शब्द, हिंदी, इंग्रजी शब्दांचा वापर तसेच जोडशब्द, छोटी छोटी वाक्ये यांचा वापर केल्यामुळे सर्व कथा रोचक बनल्या आहेत. सर्वसामान्यांच्या ओठावर असणाऱ्या म्हणींचा भरपूर प्रमाणात वापर केल्यामुळे आणि ग्रामीण बोलीभाषेचा वापर केल्यामुळे कथांना एक प्रकारचा बाज आला आहे. अशा ह्या कथासंग्रहातील म्हणी पुढील प्रमाणे आहेत.

१) पैसे वाल्याचा हेला गाभन, तेरावा मयना! (पृ. २१, परायाची लेक)

२) हाती असला तोळा त सतरंजीवर वळा आन हाती नायी चुळा त कुकळे आली पिळा. (पृ. २५, परायाची लेक)

३) धीटाई खाये मिठाई आन गरीब खाये गच्यांड्या! (पृ. ३२, मायमका)

४) याच्या दारा त्याच्या दारा, दोन लाथा अधिक मारा! (पृ. ३९, वटी)

५) संपत्तीची करते घरसार आन नादारीची करते इच्चार! (पृ. ४२, वटी)

६) गावामागं वसते त्याले कोन पुसते? (पृ. ४२, वटी)

७) अळजिब खाये त पळजिब वाटे पाये. (पृ. ४३, वटी)

८) अकातली गाय अन काटे खाय. (पृ. ५४, पयस्याची मेख)

९) दुक सोसे लेकरू आन भूक सोसे वासरू! (पृ. ६८, भोंड)

१०) जित्याची खोळ मेल्याशिवी काहाची जाते? (पृ. ७३, सपन)

११) फुई तशी भाशी आन घडली काशी! (पृ. ७५, सपन),

१२) राजाची लेक आन तिची एकच टेस! (पृ. ७६, सपन)

१३) हात वला त लागली बोला, हात कोळला त अबोला पळला! (पृ. ८३, कोळलीढन्न)

१४) मोठ्याचा आला गाळा अन गरिबाचं झोपळं मोळा. (पृ. ८७, कोळलीढन्न)

१५) सुली सांगे भुलीले आन दोनी पाय चुलीले! (पृ. ८९, कोळलीढन्न)

१६) हाती नायी ढेला अन करे गलबला. (पृ. १०५, डोयाचा खोय)

अशा या म्हणींप्रमाणेच वाक्‌प्रचारांचाही भरपूर वापर केला आहे ते पुढील प्रमाणे :-

१) घोंगडं भिजत घालणे. (पृ. ११,१२ - डुबतीची पावलं)

२) काळीज सुपभर होणे. (पृ. १४, डुबतीची पावलं)

३) कपाळी धोंडा मारणे. (पृ. १९, डुबतीची पावलं)

४) जीवाचा कातोळा करणे (पृ. २१, परायाची लेक)

५) डोक्याचे पीठ पडणे (पृ. २०, परायाची लेक)

६) जीवाला चटका लावणे. (पृ. २५, परायाची लेक)

७) चित न लागणे. (पृ. २८, परायाची लेक)

८) जीवापल्याड जपणे. (पृ. ३१, मायमका)

९) पदराखाली घेणे. (पृ. २३, मायमका)

१०) डाळ शिजू न देणे. (पृ. ३४, मायमका)

११) जीव धोक्यात घालणे. (पृ. ३८, मायमका)

१२) आपली जीभ आपल्याच हुकूमावर चालते. (पृ. ४०, वटी)

१३) हौस न फिटणे. (पृ. ५८, पयस्याची मेख)

१४) गरीबाचा कोणी वाली नसतो. (पृ. ७०, भोंड)

१५) अक्कल फुटणे (पृ. ७२, सपन)

१६) हाडाची काडं करायला लागणे. (पृ. ७६, सपन)

१७) जीवात जीव नसणे. (पृ. ७९, सपन)

१८) तोंड फुटणे. (पृ. ८०, सपन)

१९) ताक फुकून पिणे. (पृ. ८४, कोळलीढन्न)

२०) स्वतःच्या पोळीवर तूप झाकणे. (पृ. १००, दिठ)

२१) गंगेत घोडे न्हाणे. (पृ. १०६, डोयाचा खेय)

प्रतिमा इंगोले लोकसाहित्याच्या अभ्यासक असल्यामुळे त्यांच्या कथेत म्हणी व वाक्प्रचारांबरोबरच इतर अनेक शब्दांचा वापरही करताना दिसतात. हिंदी शब्दांचा वापरही करतात. उदा. हमेशा (पृ. २५), आदत (पृ. ३९), याद (पृ. ४४), बुढी (पृ.

४८), माँ (पृ. ४९),तकदीर (पृं. ५४), तकलीब (पृ. ५५), मिनती, ह्मे, सदा (पृ. ६२), गुमसुम (पृ. ६३), वापस (पृ. ६३), हरसाल (पृ. ७३), तकदीर (पृ. ७५), गलती (पृ. ८५), बिमार (पृ. ९३), मालूम (पृ. ५८) इ.

तसेच इंग्लिश शब्दांचाही त्या आपल्या कथांमध्ये वापर करतात. डेरेस (पृ. ५७), फायनलची मिटींग (पृ. ७४), बुकं (पृ. ७४), इस्टेट (पृ. ७५), डबल (पृ. ७६), हायस्कूल (पृ. ९३) अशा इंग्लिश शब्दांचा वापर केला आहे.

डॉ. प्रतिमा इंगोले समशब्दांचाही वापर करताना दिसतात. ते असे, चटकवटक (पृ. २२), भगरभगर (पृ. २५), जवाईगिवाई (पृ. २५), खरवूखरवू (पृ. २६), कातरत कातरत (पृ. २७), घळी घळी (पृ. २८), खोसू खोसू (पृ. ३३), खिवू खिवू (पृ. ३५), बूढेबाढे, लेकरं बाकर (पृ. ३७), ताहाच्यातहा (पृ. ४०), कयी कयी, झाव झाव (पृ. ४१), उतारामुतारा (पृ. ४५), कावूल बावूल (पृ. ४८), चादू चादू (पृ. ५१), झाळझुळं, लळालळ, पिवता पिवता (पृ. ५२), कुयकूय, चकाचक (पृ. ५७), टिकीमिकी (पृ. ५८), खेयता खेयता, तोळता तोळता (पृ. ६१), इकळेतिकळे, खांडखुंड (पृ. ६३), लुंडमुंड, आळधुळं (पृ. ६७), चोयू चोयू (पृ. ६९), काळ्याकुळया (पृ. ७३), आयाबाया, दायदाना (पृ. ७७), पायमाय, गयानगये (पृ. ७८), खांडमांड (पृ. ८७), घळी घळी (पृ. ९१), खरवू खरवू, भरूभरू (पृ. ९२), आयकू आयकू (पृ. ९५), टाकलं टाकलं (पृ.१०४), गुलूगुलू (पृ. १०५), भरलीभुरली (पृ. ११०)

असा हा विविधतेने नटलेला प्रतिमा इंगोले यांचा कथासंग्रह म्हणजे मराठी साहित्याला मिळालेला हिरा आहे असे मला वाटते. विविध प्रकारच्या म्हणी, वाक्प्रचार, जोडशब्द, समशब्द तसेच इंग्लिश आणि हिंदी शब्दांचा वापर यामुळे या कथासंग्रहाला एक वेगळाच दर्जा प्राप्त झाला आहे.

**'लेक भुईची' कथासंग्रहातील प्रतिमांचा वापर :-**

म्हणी व वाक्यप्रचारांप्रमाणेच प्रतिमा इंगोले यांनी या कथासंग्रहात प्रतिमांचाही वापर केल्याचे दिसून येते. या प्रतिमांचा वापर वेगवेगळ्या प्रसंगासाठी केलेला दिसतो.

उदा. ' 'पांढ्ढी आजी एक पाचऱ्या हड्डीची बाई! ह्या उच्चीपुरी! रूपाले पांढीफटक! सरसर नाकाचा सर! कपायावर ढब्बू पैयशाएवढा कुकू! आन अंगावर बावनतोयी सोन्याचं लेनं' (पृ. १८) असं ठसठशीत चित्र ही भाषा सहज रेखाटते. बोली ज्या भूमी आणि संस्कृतीतून जन्म घेते तेथून आलेल्या प्रतिमा या भाषेत सहजच येतात. 'भुईतल्या झऱ्यावानी हे ठोये असे आपसूकच भरूभरू यिवून रायले.' (पृ. ८६) 'बालपनापासून कपायीच्या कुकावानीच हे आसं मनाच्या कपायीवर जपली.' (पृ. ८६) 'तसं तिचं दुखू कनसाईच्या दान्यासारकंच बाहीर पळाले लागलं.' (पृ. ७३) 'अचानकच तिले चारी सांजा एक झाल्यासारकं वाटाले लागलं.' (पृ. १६) अशा या प्रतिमा कधी निसर्गातून तर कधी स्त्रीच्या भावजीवनातून वेचलेल्या आहेत. मूल पडल्याचं ऐकून गोकुयी 'वारा छातीवर घेत धावतच निगाली.' (पृ. ४८) असं म्हटल्यानं त्यातील त्वरा आणि चिंता साक्षात होते. '---ते त निऱ्हा खन्नक टिपरी हाये!' (पृ. १०) यातून सासू विषयी न सांगताही किती तरी सांगितले गेले आहे. 'मनाले गोचिळावानी डिकलेल्या याच सपनाच्या धुंदीत!' (पृ. ८९) अशा अयुक्त प्रतिमा क्वचितच येतात. एरव्ही प्रतिमांचा सफाईने केलेला प्रयोजक वापर या कथांमधून दिसतो.'[९]

**'लेक भुईची' मधील कथेचे वेगळेपण :-**

डॉ. सौ. प्रतिमा इंगोले यांच्या कथेची वैशिष्टये किंवा कथेचे वेगळेपण त्यांच्या कथा वाचता क्षणीच लक्षात येतात. वऱ्हाडी भाषेचं देणं लाभलेल्या प्रतिमा इंगोले आपल्या सिध्दहस्त बोलीभाषेचा वापर प्रत्येक ठिकाणी करताना दिसतात. त्यांच्या कथांमधील त्यांचा कथनाचा बाज खूपच वेगळा आहे हे लक्षात येते. तसेच प्रत्येक कथेतील पात्रांच्या तोंडचे संवाद हे सहजसुंदर विलोभनीय वाटतात. वैदर्भी बोलीभाषेच्या गोडव्यामुळे कथा ऐकताना व वाचताना मृदू वाटतात. इतर ग्रामीण कथालेखकांच्या तुलनेत प्रतिमा इंगोले यांची कथा खूपच वेगळी वाटते. त्यांच्या कथेला

एक प्रकारचा दर्जा प्राप्त झाल्याचे दिसते. कारण त्यांचे वऱ्हाडी बोलीभाषेवरचे प्रभुत्व हे होय.

'एकाच वेळी भेदक वास्तव आणि ते कथन करण्याची 'गप्पाष्टक' शैली हे डॉ. इंगोले यांच्या कथांचे एक वैशिष्टयच आहे. गुंतागुंतीचे वास्तव, मनोव्यापारातील संज्ञाप्रवाह आणि आतर्क्य जीवन यातून संदिग्ध प्रतीके व प्रतिमांचा वापर करणे कथाकाराला भाग पडते असे नवकथाकार सांगतात. पण बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वर्चस्व, मोठया कारखान्यांचे प्रदूषण, राजकारणातील गुन्हेगारीकरण आणि शेतीवर आधारित ग्रामजीवनाचे होत असलेले विरूपीकरण या सगळ्यांचा परिणाम व्यक्त करण्यासाठी कोणतीही संदिग्ध प्रतीके व प्रतिमा यांचा वापर करण्याची गरज नाही हे डॉ. इंगोले यांच्या कथेवरून लक्षात येते. सामान्य माणसाला नवकविता कळत नाही असे म्हणणारे कवी हे विसरतात की, संत तुकारामांची अस्सल कविता सामान्यांच्याच ओठावर खेळत असते.'[१०]

प्रतिमा इंगोले ग्रामीण परिसरातील लोकांची सुखदु:खे मांडतात. स्त्रियांच्या दु:खाचे नानाविध पदर त्या हळूवारपणे उलगडून दाखवितात. तेथील लोकांचा व्यवसाय, शेतीवर असणारे प्रेम तसेच मुक्या प्राण्यांचेही त्या आपल्या कथामधून भावविश्व रेखाटतात. इंगोले यांचा ग्रामीण जीवनाशी फार जवळचा संबंध असल्याने त्यांच्या कथा ह्या अस्सल ग्रामीण वऱ्हाडी कथाच वाटतात. 'चटकन् सांगता येतील अशी कितीतरी वैशिष्टये त्यांच्या कथालेखनामध्ये पृष्ठभागावरच सापडतात. त्यांच्या कथालेखनातील अनुभवविश्व ग्रामीण जीवनाशी निगडीत आहे. अस्सल ग्रामीण वातावरण उभी करणारी त्यांची भाषा आहे. अनुभवाला जसेच्या तसे वाचकांसमोर त्या उभे करतात. पावलोपावली म्हणी-वाक्प्रचार पेरत जाणारी त्यांची भाषाशैली काही समजून घेताना अवघड वाटली तरी कथेमध्ये जिवंतपणा (Liveness) निर्माण करणारी आहे.

डॉ. प्रतिमा इंगोले यांच्या कथांची ही सर्व वैशिष्टये त्यांच्या 'लेक भुईची' या कथासंग्रहात पुन्हा प्रत्ययाला येतात. डॉ. इंगोले यांच्या पूर्वसिध्द कथा या संग्रहामध्ये आहेत. 'लेक भुईची' मध्ये अकरा कथा आहेत. या सर्व कथांमधून ग्रामीण जीवनाचे एक अस्वस्थ करणारे वास्तव आपल्यापुढे उभे राहते.

एकाच वेळी विविध प्रकारच्या वेदनांची ठसठस जाणवत राहावी त्याप्रमाणे या कथांमधील अनुभवांमध्ये ठसठस जाणवत राहते. मनात रेंगाळत राहते. पूर्णपणे ग्रामीण बोलीभाषा काहीशी कठीण वाटत असली तरी अनुभवातील वेदनेचा सल वाचकांपर्यंत निश्चित पोचतो. एक प्रकारची ठसठस निर्माण करतो. ही निर्माण होणारी ठसठस हेच या कथांचे आणि पर्यायाने लेखिकेचे कलात्मक यश आहे.'[११]

अशा या प्रतिमा इंगोले यांच्या प्रत्येक कथेमधून त्यांच्या कथेचे वेगळेपण सिध्द होते आणि त्यांचे त्याच्या भाषाशैलीवर असणारे प्रभुत्व सिध्द होते त्यांनी जे पाहिले, अनुभवले तेच त्यांनी आपल्या कथांमधून व्यक्त केले आहे. त्यामध्ये कुठेही कृत्रिमपणा जाणवत नाही. हेच त्यांच्या कथांचे वेगळेपण होय.

**लेखनाच्या मर्यादा :-**

'लेक भुईची' या कथासंग्रहात लेखिकेच्या लेखनामध्ये मर्यादा आढळतात. त्यांच्या कथा वाचताना काही काही शब्दांचा अर्थ कळत नाही. तसेच इतर भाषा बोलणाऱ्या लोकांना वऱ्हाडी भाषा पूर्णपणे समजणार नाही त्यामुळे लेखिकेने प्रमाण भाषेचा वापर करणे श्रेयस्कर वाटते. तसेच 'ही कथा अकारण विस्तार करते. निवेदनाचे नाना पवित्रे कधी उगाचच घेते. ती काहीशी ढोबळ आणि एकेरी वाटते. तिच्यात व्यापकता आहे, पण सूक्ष्मता नाही. व्यामिश्रतता नाही. ह्या तिच्या मर्यादा आहेत. आपली कथा उदयासाठी एक आश्वासन देते. पण तिच्या अंगभूत गुणवत्तेला साजेसा असा आविष्कार तिला अजून घडविता आलेला नाही तो घडावा.'[१२]

लेखिकेचे बोली भाषेवर प्रभुत्व असल्याने अकारण पाल्हाळ व कथेचा विस्तार होताना दिसतो. तसेच 'डुबतीची पावलं' आणि 'मायमका' या कथांमध्ये उद्‌गारचिह्नहे रसिक वाचकांचे लक्ष वेधून घेतात.

डॉ. आनंद यादव प्रतिमा इंगोलेंच्या लेखनाच्या मर्यादा सांगताना लिहितात की, त्यांच्या 'कथा अजून एकपदरी वाटतात. जनसामान्यांची जी समजूत असते त्या कथेच्या बाहेर तुमच्या कथेची कथा फारशी जाऊ शकत नाही. जीवनातील घटनाप्रसंग व्यक्तीपरंपरागत रूढी, समजुती, देवदेवस्कपण यांच्याकडे प्रतिभावंत काही वेगळ्याच नजरेने पाहतो. आणि त्यातील मुळात असलेली 'नस'च पकडून दाखवितो. असे तुमच्या कथांतून सहसा दिसत नाही. अर्थात वय, अभ्यास, चिंतन, वाचन हे वाढत जाईल तसे तुम्हाला तेही जमू शकेल असे वाटते.

तुमची कथा गोष्टीवेल्हाळातच रमताना जाणवते. जे घडले ते रमून सांगण्यात, चटकदारपणे सांगण्यात धन्यता मानते. लेखनाच्या आरंभीच्या काळात हे ठीक असले तरी तेथेच जन्मभर थांबता येणार नाही. शैली हे शेवटी साधनच असते, साध्य नसते. म्हणून तुम्ही जीवनाचा सखोल वेध घेण्यासाठी अधिक चिंतन वाचन करावे, करत रहावे.'[१३]

अशा ह्या लेखनाच्या मर्यादा लेखिकेच्या 'लेक भुईची' या कथासंग्रहातून दिसून येतात.

**समारोप :-**

अशा प्रकारे 'लेक भुईची' हा प्रतिमा इंगोले यांचा कथासंग्रह विविधतेने नटलेला दिसतो. त्यातील स्त्रिया, पुरूष, मुके प्राणी यांचे चित्रण तसेच बोलीभाषेतील संवाद, म्हणी व वाक्प्रचारांचा भरपूर वापर करून कथा कलात्मक केल्या आहेत. त्यांची साधी, सोपी, सरळ आणि ओघवती भाषाशैली यामुळे कथा खूपच आकर्षक झाल्या आहेत. तसेच विशिष्ट अशी प्रसंगनिर्मिती, ग्रामीण भागातील लोकांचे व्यवसाय, राहणीमान त्यांचे दर्शन या कथासंग्रहातून घडते. अत्यंत लोकप्रिय असा हा इंगोले यांचा कथासंग्रह

आहे. प्रतिमा इंगोले यांनी जे पाहिले, अनुभवले तेच आपल्या कथांमधून मांडल्यामुळे त्यांच्या कथा विलक्षण विलोभनीय वाटतात. त्यांच्या प्रत्येक कथेतील आशय एक वेगळा अनुभव सांगून जातो. ग्रामीण भागातील भुईच्या लेकाची आणि लेकीची व्यथा, वेदना त्या मांडतात. त्यातील ठसठस रसिक वाचकाला जाणवत राहते आणि वाचकही अंतर्मुख होऊन जातो. अशा ह्या इंगोले यांच्या कथा विशिष्ट अशा दर्जा असलेल्या कथा वाटतात.

पुढील प्रकरणात आपण एकूण सर्व प्रकरणांचा निष्कर्ष पाहणार आहोत.

**संदर्भ :-**


१) 'लेकीचं कर्तृत्व', सं. विमलाबाई कुकडे, प्रतिमा इंगोले ह्यांच्या 'लेक भुईची' कथासंग्रहावरील परीक्षणात्मक लेख, लोकधाटीतील नवकथा, डॉ. प्रमोद मुनघाटे, लेखिका पुस्तक प्रकाशन प्रकल्प, प्रथमावृत्ती, सप्टेंबर २००२, (पृ.६३).

२) 'लेकीचं कर्तृत्व', सं.विमलाबाई कुकडे, प्रतिमा इंगोले ह्यांच्या 'लेक भुईची' कथासंग्रहावरील परीक्षणात्मक लेख, भावगर्भ चिंतनपर कथा : भुईची लेक,डॉ. कल्याणी हर्डीकर, लेखिका पुस्तक प्रकाशन प्रकल्प, प्रथमावृत्ती, सप्टेंबर २००२, पृ.६८.

३) 'लेकीचं कर्तृत्व', सं. विमलाबाई कुकडे, प्रतिमा इंगोले ह्यांच्या 'लेक भुईची' कथासंग्रहावरील परीक्षणात्मक लेख, लेक भुईची : ग्रामीण स्त्रीच्या दु:खाची विविध रूपे प्रा. रोहिणी सावदेकर, नागपूर, लेखिका पुस्तक प्रकाशन प्रकल्प, प्रथमावृत्ती, सप्टेंबर २००२, पृ.४५.

४) 'लेकीचं कर्तृत्व', सं. विमलाबाई कुकडे, प्रतिमा इंगोले ह्यांच्या 'लेक भुईची' कथासंग्रहावरील परीक्षणात्मक लेख, लेक भुईची : असहाय्य जीवनाच्या वऱ्हाडी कथा, प्रा. गा.रा. तायडे, वैजापूर, लेखिका पुस्तक प्रकाशन प्रकल्प, प्रथमावृत्ती, सप्टेंबर २००२, पृ.३९.

५) 'लेकीचं कर्तृत्व', सं. विमलाबाई कुकडे, प्रतिमा इंगोले ह्यांच्या 'लेक भुईची' कथासंग्रहावरील परीक्षणात्मक लेख, लेक भुईची : ग्रामीण स्त्रीच्या दु:खाची विविध रूपे प्रा. रोहिणी सावदेकर, नागपूर, लेखिका पुस्तक प्रकाशन प्रकल्प, प्रथमावृत्ती, सप्टेंबर २००२, पृ.४३,४४.

६) 'लेकीचं कर्तृत्व', सं. विमलाबाई कुकडे, प्रतिमा इंगोले ह्यांच्या 'लेक भुईची' कथासंग्रहावरील परीक्षणात्मक लेख, लेक भुईची : वऱ्हाडी ग्रामीण संस्कृतीचे चित्र रेखाटणाऱ्या कथा, डॉ. ललिता गादगे, अहमदपूर, लेखिका पुस्तक प्रकाशन प्रकल्प, प्रथमावृत्ती, सप्टेंबर २००२, पृ.४२.

७) 'लेकीचं कर्तृत्व', सं. विमलाबाई कुकडे, प्रतिमा इंगोले ह्यांच्या 'लेक भुईची' कथासंग्रहावरील परीक्षणात्मक लेख, 'लेकीची कैफियत', ज्योत्स्ना आफळे, आकांक्षा, नागपूर, लेखिका पुस्तक प्रकाशन प्रकल्प, प्रथमावृत्ती, सप्टेंबर २००२, पृ.५६,५७.

८) 'पानावरील रेषा', सं. विमलाबाई कुकडे, प्रतिमा इंगोले ह्यांच्या 'हजारी बेलपान' कथासंग्रहावरील परीक्षणात्मक लेख, वाचायलाच हवं : हजारी बेलपान, प्रा. कमल देसाई, पुणे, सोनल प्रकाशन, प्रथमावृत्ती, ४-११-९५, पृ.२१.

९) 'लेकीचं कर्तृत्व', सं. विमलाबाई कुकडे, प्रतिमा इंगोले ह्यांच्या 'लेक भुईची' कथासंग्रहावरील परीक्षणात्मक लेख, लेक भुईची : ग्रामीण व स्त्रीवादी प्रवाहांच्या संगमावरील कथा, डॉ. प्रा. रत्नाकर बापूराव मंचरकर, अहमदनगर, लेखिका पुस्तक प्रकाशन प्रकल्प, प्रथमावृत्ती, सप्टेंबर २००२, पृ.२५.

१०) 'लेकीचं कर्तृत्व', सं. विमलाबाई कुकडे, प्रतिमा इंगोले ह्यांच्या 'लेक भुईची' कथासंग्रहावरील परीक्षणात्मक लेख, लोकधाटीतील नवकथा, डॉ. प्रमोद मुनघाटे लेखिका पुस्तक प्रकाशन प्रकल्प, प्रथमावृत्ती, सप्टेंबर २००२, पृ.६४,६५.

११) 'लेकीचं कर्तृत्व', सं. विमलाबाई कुकडे, प्रतिमा इंगोले ह्यांच्या 'लेक भुईची' कथासंग्रहावरील परीक्षणात्मक लेख, ग्रामीण जीवनातील विविष विषयांना स्पर्श करणाऱ्या कथा, डॉ. स्वाती सुहास कर्वे, (अक्षर वैदर्भी, अमरावती), लेखिका पुस्तक प्रकाशन प्रकल्प, प्रथमावृत्ती, सप्टेंबर २००२, पृ.५८, ५९.

१२) 'लेकीचं कर्तृत्व',सं. विमलाबाई कुकडे, प्रतिमा इंगोले ह्यांच्या 'लेक भुईची' कथासंग्रहावरील परीक्षणात्मक लेख, एक खुले पत्र, डॉ.र.बा. मंचरकर, (अक्षर वैदर्भी, अमरावती),लेखिका पुस्तक प्रकाशन प्रकल्प, प्रथमावृत्ती, सप्टेंबर २००२, पृ.८५.

१३) 'पानावरील रेषा', सं. विमलाबाई कुकडे, प्रतिमा इंगोले ह्यांच्या 'हजारी बेलपान' कथासंग्रहावरील परीक्षणात्मक लेख, परीक्षणात्मक पत्रे, डॉ. आनंद यादव, धनकवडी, पुणे, २-१-८५, सोनल प्रकाशन, प्रथमावृत्ती, ४-११-९५, पृ.५१.

***